<table>
<tr><td>पूर्ण नाव: श्री. कृष्णा चंद्रा प्रधान<br>फार्मचा पत्ता: समता नगर<br>घरचा पत्ता: प्लॉट न. ८३२, मॉडेल टाऊन, बेझनबाघ, नागपूर ४४० ००४<br>मोबाईल क्र.: ९५६१०८५७७३<br>इमेल आय डी.: kcpngp@gmail.com<br>शिक्षण: कॉमर्स ग्र्याजुएट +डबल आयटीआय जनरल इलेक्ट्रोनिक व रेफ्रिजरेटर व एअर कंडीशनिंग<br>जन्म तारीख: १५/०६/१९६६<br>वय: ५४ वर्ष</td><td></td></tr>
</table>

**2. कुटुंबाची माहिती** – मुळचे ते ओडीसा राज्यातील असून त्यांचे आई वडील शेतीसोबतच गायी–म्हशी व बकरया याचं पालन करायचे. संयुक्त कुटुंब असल्यामुळे त्यांचे काका वगरे मासे व झिंगा पालन करायचे त्यामुळे श्री कृष्णा यांना सुरुवातीपासूनच वेगवेगळया व्यवसायाबद्दल थोडीफार माहिती व आवड होती.

३. **नोकरी माहिती–** नागपूर येथील श्री. कृष्णा चंद्रा प्रधान हे व्यवसायाने लोको पायलट असून ते साऊथ इस्टर्न रेल्वेमध्ये नोकरी करतात व सोबतच कुक्कुटपालन सुद्धा करतात.

४. **सद्यस्थिती आणि प्रशिक्षण माहिती** –नागपूरमध्ये स्थायी झाल्यापासून त्यांनी २०१६ ते १७ च्या दरम्यान स्वतःच कुक्कुटपालन बुटीबोरी येथे सुरु केले . त्यांच्याकडे स्वतःची जमीन नसल्यामुळे त्यांनी एका मित्रासोबत त्याच्या जागेवर पार्टनरशिपमध्ये १ लाख रुपयाची गुंतवणूक करून ३०० डीपी चे पिल्ले घेऊन कुक्कुट पालनास सुरुवात केली . परंतु त्यांना वैज्ञानिकदृष्ट्या महत्वाची माहिती नसल्याने त्यांना फारसा लाभ झाला नाही तसेच मरतुकीचे प्रमाण जास्त झाल्याने आर्थिकदृष्ट्या त्यांना तोटा झाला . परंतु खचून न जाता त्यांनी त्यांचे कुक्कुटपालनाचे यशस्वी प्रयत्न सुरु ठेवले . याचदरम्यान त्यांनी नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालया अंतर्गत असणाऱ्या कुक्कुटपालन प्रशिक्षण केंद्रामध्ये डॉ . मुकुंद कदम व डॉ . दर्शना भैसारे यांच्याकडून पाच दिवसीय व्यावसायिक कुक्कुटपालन या विषयावर प्रशिक्षण घेतले.

५. **व्यवसाय कधी सुरु केला** – त्यांनी २ एकर जागा लीजवर घेऊन त्यात बकरीपालन व कुक्कुटपालन सुरु केले . त्यात त्यांनी १००० काकरेल , ४०० डी .पी. जातीच्या कोंबडीचे चे पिल्ले , ६०० क्रायलर , २५ ते ३० बदक ठेवले . सद्यस्थितीत त्यांच्याकडे हे पक्षी उपलब्ध असून फार्मवरूनच पक्ष्यांची विक्री करतात . एक दिवसीय पिल्ले व मोठे पक्षी विक्रीसाठी उपलब्ध असतात. डी.पी. चे पक्षी २५० ते ३०० रुपये प्रती किलो तर कडकनाथ पक्षी ७५० ते ८०० रु. प्रती किलो याप्रमाणे विकतात.

६. **घरातील लोकांची मदत** –त्यांच्या पत्नी सुद्धा पक्ष्यांच्या विक्रीसाठी त्यांना मदत करतात व खर्चाचा हिशोब व्यवस्थित ठेवतात.
७. **सद्यस्थिती आणि उत्पन्न–** सध्या दर महिन्याला त्यांना १५ ते २० हजार रुपये कुक्कुटपालनातून मिळतात . तसेच त्यांना रिटायर्ड झाल्या नंतर च्या कालावधीत ५० अंडी क्षमतेचे ५ ते ६ अंडी उबवणूक यंत्रे बनवायची आहेत जेणेकरून ते देशी कोंबड्यांची व लाव्ही पक्ष्यांचे पिल्ले या यंत्रातून निर्माण करू शकतील व गरजूंना पुरवठा करतील . या व्यवसायात त्यांनी स्वतःसोबतच एका व्यक्तीला रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

8 **यशाचे सूत्र आणि भविष्यातील नियोजन** – भविष्यात त्यांना स्वतःची जमीन विकत घेऊन देशी पक्ष्यांची संख्या तसेच क्रायलर पक्ष्यांची संख्या वाढवायची आहे जेणेकरून ते पक्ष्यांच्या वाढत्या डिमांड ला स्वतः पूर्ण करू शकतील व त्यातून जास्तीत जास्त नफा कमवू शकतील.
९. **प्रशिक्षणाचा फायदा** – प्रशिक्षणामध्ये त्यांना कोंबड्यांच्या विविध जाती , त्यांचे खाद्य व्यवस्थापन , ब्रूडिंग व्यवस्थापन , लसीकरण वेगवेगळया रोगांचे निवारण, शवविश्चेदन, औषधी, इत्यादी विविध विषयांवर मार्गदर्शन मिळाले.
१०. **राहणीमानात फरक:–** कुकूट पालन मुळे माझे सामाजिक व आर्थिक मान उंचावली तसेच माझ्या पाहुणे मंडळी चा माझ्या कडे पाहणाच्या दृष्टीकोन बदलला

11. **युवकांना सल्ला यशाचे श्रेय** – पुढील युवा पिढीला ते सल्ला देतात कि कुठलाही व्यवसाय सुरु करताना स्वतःवर विश्वास ठेवावा. त्यांच्या या यशाचे श्रेय त्यांनी डॉ . मुकुंद कदम व कुक्कुटपालन शास्त्र विभाग , नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांना दिले आहे.

**मार्गदर्शकाचे नाव:**

**१. डॉ. मुकुंद एम. कदम**
सहाय्यक प्राध्यापक, कुक्कुटपालन शास्त्र विभाग, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ८८८८८३६३७४
**२. डॉ. दर्शना बी. भैसारे**
सहाय्यक प्राध्यापक, कुक्कुटपालन शास्त्र विभाग, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ८४३९७८७६२२